पेस्ट कंट्रोल
झुरळ, डास, मुंग्या, कोळी , पाल, गोम, गोचीड, पिसवा, उंदीर, घुस, लाईटचे किडे, वाळवी, ढेकुन इ.
या सारख्या किटकांपासुन मुक्तता.
औषधाचा वास नाही, रंग नाही, साइड इफेक्ट नाही.
शिवाय घरात जास्त आवरा आवर नाही.
अपेक्स बायोटेक पेस्ट कंट्रोल
जेऊर (बा.), अहिल्यानगर.
संदीप पवार - 98 23 75 17 76

दैनिक
मनोरंजनासह प्रबोधनासाठी...
epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक २८९ वा ● गुरुवार, ता.१७ एप्रिल २०२५ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००

3 ऱ्या वर्षात यशस्वी पदार्पण
आमच्यासोबत आपला प्रवास सुखाचा होईल..
विराज ट्रॅव्हल्स

प्रवाशांच्या सहकार्यामुळे विराज ट्रॅव्हल्सची यशस्वी वाटचाल,
सर्व ग्राहकांचे आभार !
पंकज गुंदेचा 9822496664 9403448649

रयत समाचार पोर्टल
Scan QR Code
रयत समाचार चॅनल
Scan QR Code
इंग्रजी रयत समाचार वाचण्यासाठी
Scan QR Code

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

## चंदनशिवे, पुणेकर यांची तक्रार निवारण समितीमध्ये वर्णी




**मुंबई | प्रतिनिधी**

राज्यातील तमाशा आणि कलाकेंद्र कलावंतांच्या विविध तक्रारींचे निवारण करण्यासाठी दोन स्वतंत्र समित्यांच्या गठनाचा निर्णय सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी घेतला.

या समित्या तमाशा आणि कलाकेंद्र क्षेत्रातील फड मालक, कलाकार, वादक यांच्यासमोरील समस्या समजून घेऊन, पारंपरिक लोककला टिकवून ठेवण्यासाठी उपाययोजना सुचवतील, अशी माहिती मंत्री ॲड.शेलार यांनी दिली. तमाशा तक्रार निवारण समितीमध्ये सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक हे अध्यक्ष असणार असून, तमाशा फड मालक रघुवीर खेडकर, तमाशा फड मालक गोपाळ नाना शेषेराव, फड मालक संभाजी जाधव, कलाकार मंगलाताई बनसोडे, कलाकार अतांबर तात्या शिरढोणकर, अभ्यासक गणेश चंदनशिवे, अभ्यासक खंडुराज गायकवाड व सहसंचालक सदस्य म्हणून काम पाहतील. कलाकेंद्र तक्रार निवारण समितीमध्ये संचालक सांस्कृतिक कार्य हे अध्यक्ष असणार असून, कलाकेंद्र मालक बाळासाहेब काळे, कलाकेंद्र मालक अभिजित काळे, कलाकार रेश्मा परितेकर, कलाकार सुरेखा पुणेकर, कलाकार प्रमिला लोदगेकर, कलाकार संघटनेचे धोंडीराम जावळे, अभ्यासक प्रकाश खांडगे व सहसंचालक हे सदस्य म्हणून काम पाहतील.



## आंबेडकर स्मारकामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा- मिसाळ

### इंदू मिल डॉ. आंबेडकर स्मारकाची पहाणी करून घेतला आढावा

**मुंबई | गुरूदत्त वाकदेकर**

सामाजिक न्याय, नगरविकास, परिवहन, वैद्यकीय शिक्षण, अल्पसंख्याक व औकाफ राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी इंदू मिल येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाची प्रत्यक्ष पाहणी केली आणि कामकाजाचा आढावा घेतला. चैत्यभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतीस्थळाला भेट देऊन त्यांना वंदन केले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यकर्तृत्वाने तरुणांमध्ये एक वेगळी ऊर्जा निर्माण होते. त्यांचे शैक्षणिक व सामाजिक कार्य पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा, असे निर्देश राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी यावेळी दिले. भेटीप्रसंगी आमदार भाई गिरकर, सहसचिव सोमनाथ बागुल, सह आयुक्त प्रसाद खैरनार, कार्यकारी अभियंता प्रदीप अहिरे, नगरसेविका समिता कांबळे, माजी नगरसेवक शरद कांबळे, राहुल कांबळे, अशोक कांबळे आदीसह, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई महानगरपालिका, सामाजिक न्याय विभागाचे अधिकारी व लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

### अ.भा. किसान सभा राष्ट्रीय अधिवेशन

## ऊस प्रश्न पेटणार- कॉम्रेड संजय नांगरे



**नागापट्टणम| प्रतिनिधी**

तामिळनाडू तील नागापट्टणम येथे अखिल भारतीय किसान सभेचे तीन दिवसीय अधिवेशन सुरू आहे. अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी ता. १६रोजी अखिल भारतीय किसान सभेचे सदस्य कॉम्रेड संजय नांगरे यांनी ऊसाला एफआरपीप्रमाणे ऊसदर देण्यात यावा. एफआरपी कायद्याची प्रखरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. कारखानदारांकडून होणारी शेतकऱ्यांची वजनाची काटामारी तत्काळ थांबविण्यात यावी. हे अहिल्यानगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचे दोन प्रश्न उपस्थित करून

**अहिल्यानगर येथेही भरणार ऊस उत्पादक शेतकऱ्यांची राष्ट्रीय परिषद**

भविष्यात ऊस दराबाबतचा प्रश्न पेटणार असल्याचे सांगितले. अखिल भारतीय किसान सभेचे तीन दिवसीय अधिवेशन तामिळनाडूमध्ये नागापट्टिनम येथे सुरू आहे. अहिल्यानगरमध्ये प्रामुख्याने ऊसदराबाबत, कारखानदारांकडून होणाऱ्या शेतकऱ्यांच्या ऊसाच्या वजनाबाबतची काटामारीबाबत ऊसउत्पादक शेतकरी, साखर कारखानदार व अखिल भारतीय किसान सभा यांच्यामध्ये कायम संघर्ष पहावयास मिळतो. हा प्रश्न अखिल भारतीय किसान सभेच्या राष्ट्रीय अधिवेशनात उचलला गेल्यामुळे भविष्यात अहिल्यानगरमध्ये ऊसदराबाबत मोठा संघर्ष होण्याची चिन्हे दिसत आहेत.

अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे राष्ट्रीय अधिवेशन होणार आहे, अशी माहिती संजय नांगरे, संदीप इथापे,निवृत्ती दातीर यांनी दिली.

## न्याय फक्त आयुर्वेदला

### बाकीचे फक्त बोलघेवडे आणि रीलघेवडे

अहमदनगर शहरात विधानसभा निवडणुकीत ज्या पद्धतीने निकाल लागला त्यानंतर तरी भावी आमदारांनी आत्मपरीक्षण करायला हवे होते, मात्र दुर्दैवाने तसे झालेले नाही. बोटावर मोजण्याइतक्या चार जवळच्या व्यक्तींचे मित्रमंडळ म्हणत स्वतःचाच उदो उदो करून घेण्यात ही भावी मंडळी धन्य मानत असून नागरिकांच्या प्रश्नांचा सर्वच भावी आमदारांना विसर पडलेला आहे. किरकोळ कामासाठी भावी आमदाराच्या पाठी फिरण्यापेक्षा सत्ताधारी संग्राम जगताप देखील 'इझी ॲक्सेसिबल असल्याने नागरिकांनी तरी भावी आमदारांच्या पाठी का फिरावं ? विद्यमान आमदार यांच्याकडे मुबलक मनुष्यबळ, पैसा यावर यावर त्यांची सत्ता टिकून आहे, असा आरोप भावी आमदारांकडून करण्यात येतो. मात्र केवळ इतक्याच गोष्टींवर सत्ता मिळत नाही, त्यासाठी निष्ठावंत कार्यकर्त्यांची फौज लागते. मात्र अशी फौज आज रोजी आमदार जगताप वगळता इतर कुणाकडेही नाही. आ. जगताप यांच्याकडील मनुष्यबळ सक्षम आणि कार्यक्षम असल्याने नागरिक अडीअडचणीला त्यांच्याकडेच मदतीसाठी धावतात. मात्र या गोष्टीवर आत्मपरीक्षण करण्याऐवजी केवळ मनुष्यबळ आणि पैसा यावर हा विषय लोटून भावी आमदार स्वतः चा निष्क्रियपणा पद्धतशीरपणे लपवतात.

आमदार जगताप यांच्याकडून शिकण्यासारख्या अनेक गोष्टी भावी आमदारांकडून आत्मसात केल्या जात नाहीत. उलट मदतीसाठी आलेल्या व्यक्तींसोबत रील्स आणि फोटोसेशन करून घेण्यावरच सध्या सगळ्याच भावी आमदारांचे समाजकार्य विसंबून आहे. बोल घेवडे आणि रिल घेवडे यांच्याच चौकटीत शहरातील विरोधी पक्ष बंदिस्त असून अडचणीतील व्यक्ती नक्की फोटो काढून घेण्यासाठी आलाय की अडचण सोडवण्यासाठी असा प्रश्न मदतीसाठी आलेल्या माणसालाही नक्कीच पडत असणार, हो ना ? अहिल्यानगर शहरात फिरून शिवसेनेच्या उद्धव ठाकरे गटाच्या चार नेत्यांची नावे सांगा म्हटले तर स्वर्गीय अनिल राठोड यांच्यानंतर दुसरे नाव नगरमध्ये सहसा कुणाला सांगता येणार नाही. शिवसेनेत फूट पडल्यानंतर नक्की कोण कुठे ? याचा नगरकरांनाही तपास नाही तशीच परिस्थिती सध्या राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाची झालेली आहे. विधानसभा निवडणुकीतील उमेदवार वगळता बाकीचे दुर्बीण लावून शोधावे इतपत विलुप्त होण्याच्या मार्गावर आहेत. शोले चित्रपटातील 'निम्मे इकडे जा निम्मे तिकडे जा बाकीच्यांनी माझ्या पाठीमागे या,' या डायलॉगची आठवण या निमित्ताने आल्याशिवाय राहत नाही. इतपत शहरातील विरोधी पक्ष सध्या रिकामा झालेला आहे.

कागदोपत्री केवळ नावे आहेत पदेही आहेत मात्र कुठलीच राजकीय भूमिका नाही. कागदोपत्री अस्तित्व टिकवणे हेच फक्त राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे

**ग्यानबाची मेख**

सध्याचे धोरण दिसत असून काँग्रेस पक्षाची परिस्थिती तर उद्धव ठाकरे गट आणि शरद पवार गटापेक्षाही दयनीय आहे. कुठे गेला तो काळ जेव्हा पेट्रोल एक रुपयांनी वाढले तर बैलगाडी आंदोलन व्हायचे...हेल्मेट सक्तीच्या विरोधात फेटे घालून आंदोलक रस्त्यावर यायचे. गॅस सिलेंडर दहा रुपयांनी वाढला तर लोक रस्त्यावर यायचे पण आज सगळं काही बदललेय, कारण विरोधकांमध्ये इच्छाशक्तीच राहिलेली नाही निष्क्रिय विरोधी पक्ष आपल्यावर गुन्हा दाखल होईल अन् न्यायालयाच्या खेटा माराव्या लागतील या भीतीने शांत पडलेला असून निवडणुकीच्या निमित्तानेच पुन्हा डोके वर काढेल मात्र अशांना जनता निवडणुकीत पुन्हा एकदा अस्मान दाखवल्याशिवाय राहणार नाही हे निश्चित.

आमदार जगताप सत्ता हाती आहे म्हणून कामे करतात असे देखील आरोप त्यांच्यावर अनेकदा भावी आमदार करत असतात. मात्र सत्ता हाती नसताना देखील संग्राम जगताप यांचे वडील माजी आमदार अरुण जगताप यांनी अनेक जणांची कामे मार्गी लावली आहेत. जगताप कुटुंबीयांच्या पाठीमागे उभी असलेली कार्यकर्त्यांची फळी ही एका रात्रीत उभी राहिलेली नाही. प्रचंड सक्रियता, निष्ठावंत कार्यकर्त्यांची फौज यामुळे संग्राम जगताप यांची स्वतःची प्रचार यंत्रणा उभी राहिलेली आहे आणि त्याचीच परिणीती विधानसभा निवडणुकीच्या निकालात झाली. विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने तरी संग्राम जगताप यांचे विरोधक एकत्र येतील अशी अनेक जणांना आशा होती मात्र आजही परिस्थितीत काहीच फरक झालेला नाही. इंडिया आघाडी शहरात आहे की नाही इतपत दयनीय परिस्थिती असून शिवसेनेच्या उद्धव ठाकरे गटाचे देखील नेमके किती कार्यकर्ते ठाकरे गटात आहेत आणि किती शिंदे गटात ? याची शहर शिवसेनेलाच खबरबात नसावी. स्वर्गीय अनिल राठोड यांच्या काळात त्यांनी एकट्याने स्वतःच्या खांद्यावर शिवसेना सांभाळली मात्र आज रोजी शिवसेनेच्या उद्धव ठाकरे गटाकडे असे कुठलेही संघटन कौशल्य असलेले नेतृत्व दिसून येत नाही. शहरात शिवसेनेच्या ठाकरे गटाकडे आज सुशिक्षित नेतृत्व आहे तर शरद पवार गटाकडे देखील सुशिक्षित नेतृत्व शहरात आहे मात्र 'अति शहाणा त्याचा बैल रिकामा' अशी परिस्थिती या दोन्ही पक्षांची शहरात झालेली आहे.

फोटो, व्हिडिओ आणि रिल्स याच्यावर पक्ष चालत नाही तर वेळोवेळी राजकीय भूमिका घेणेदेखील गरजेचे असते याचाही विरोधी पक्षाला विसर पडलेला आहे. शहरात अनेक मुद्दे आहेत मात्र मुद्द्यांना हात घालण्याची इच्छाशक्तीच विरोधी पक्षात दिसून येत नाही. महापालिकेतील बांधकाम परवाने असो, शहरातील रस्ते असो, पथदिवे असो किंवा शहरातील बेरोजगारी सर्वच पातळीवर अहिल्यानगर शहरातील विरोधी पक्ष हा सपशेल अपयशी ठरतो आहे.



## श्रीक्षेत्र चौंडी विकास आराखडा कार्यवाही तातडीने पूर्ण करा- सभापती शिंदे

**मुंबई | प्रतिनिधी**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची त्रिशताब्दी जयंती पुढील महिन्यात ता.३१ मे २०२५ रोजी येत आहे. त्यानिमित्त जन्मगाव चौंडी, ता.जामखेड, जि.अहिल्यानगर येथे देशभरातील पर्यटक आणि इतिहासप्रेमींना त्यांच्या कार्यकर्तृत्वाची माहिती देणाऱ्या श्रीक्षेत्र चौंडी विकास आराखड्यासंदर्भातील कार्यवाही तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांनी विधान भवन येथे बैठकीत दिले. यावेळी मुख्य सचिव श्रीमती सुजाता सौनिक यांची विशेष उपस्थिती होती.

### लॉटरीच्या मासिक, साप्ताहिक सोडती काढल्या जातात

**मुंबई | प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य लॉटरीतर्फे प्रत्येक महिन्यात मासिक सोडती तसेच साप्ताहिक सोडती काढल्या जा-तात. माहे मार्च २०२५ मध्ये २९ मार्च २०२५ रोजी महाराष्ट्र गुढीपाडवा (भव्यतम), ७ मार्च २०२५ रोजी महाराष्ट्र सहयाद्री, १२ मार्च २०२५ रोजी महाराष्ट्र गणेशलक्ष्मी होळी विशेष, १९ मार्च २०२५ रोजी महाराष्ट्र गौरव, २१ मार्च २०२५ रोजी महाराष्ट्र तेजस्विनी व २५मार्च २०२५ रोजी महाराष्ट्र गजराज या मासिक सोडती काढण्यात आल्या असल्याचे वाशी येथील महाराष्ट्र राज्य लॉटरी कार्यालयाचे उपसंचालक (वित्त व लेखा) यांनी कळविले आहे.

## उर्दू भारतीय भाषा; कोणत्याही धर्माशी तिचा संबंध नाही

### सर्वोच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय

**नवी दिल्ली – सलीमखान पठाण**

'उर्दू ही लोकभाषा आहे. ती कोणत्याही धर्माशी जोडलेली नाही आणि मराठीबरोबर तिच्या वापरावर कोणताही कायदेशीर प्रतिबंध नाही,' असे सांगत अकोला जिल्ह्यातील पातूर नगरपालिकेला उर्दूत फलक लावण्यास विरोध करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी फेटाळून लावली.

भाषिक विविधतेचा आदर राखणे महत्त्वाचे असून उर्दूसह इतर भाषांशी मैत्री करूया, असे मत न्यायालयाने यावेळी नोंदवले. अकोला जिल्ह्यातील पातूर नगरपालिकेच्या इमारतीवर लावण्यात आलेल्या फलकावर मराठीसह उर्दूचा वापर करण्यात आला आहे. पातूर नगरपालिकेच्या माजी नगरसेविका वर्षा संजय बागडे यांनी याला विरोध करत मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. उच्च न्यायालयाने हा फलक वापरण्यास परवानगी दिल्यानंतर त्याला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. मात्र न्यायमूर्ती सुधांशु




धुलिया आणि न्यायमूर्ती विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने कायद्यात उर्दूला बंदी नसल्याचे स्पष्ट केले.मराठीसह इतर भाषेचा वापर फलकात करणे हा महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण (अधिकृत भाषा) कायद्याचा भंग नाही, असेही न्यायालयाने सांगितले.

न्यायालय काय म्हणाले? पातूर नगरपालिकेच्या इमारतीवर उर्दू भाषेत फलक लावण्यास माजी नगरसेविकेने विरोध केला.अमरावतीच्या आयुक्तांनी अर्ज बाद केल्यावर मुंबई उच्च न्यायालयात याचिका फेटाळली. त्यावर नगरसेविकेने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. उर्दूचा वापर हा केवळ संवाद अधिक मजबूत करण्यासाठी असून भाषेच्या विविधतेचा आदर राखायलाच हवा. भाषा ही नागरिकांमध्ये फूट पाडण्यास कारणीभूत ठरताच कामा नये. स्थानिक स्वराज्य संस्थेचे काम जनतेला दैनंदिन सेवा देण्याचे असते.फलकावर राज्याच्या अधिकृत मराठी भाषेव्यतरिक्त उर्दूचा वापर केला जात असेल,तसेच पालिकेच्या हद्दीतील नागरिकांना जर उर्दू समजत असेल तर आक्षेप घेण्याचे काहीच कारण नाही. उर्दू ही काही बाहेरील भाषा नाही. मराठी प्रमाणेच इंडो-आर्यन गटातील भाषा आहे. याच भूमीत तीचा जन्म झाला.

येथेच उर्दू विकसित झाली. विविध नागरिकांच्या गरजेनुसार वेगवेगळे सांस्कृतिक बंध असलेल्या लोकांची ही संवाद भाषा आहे. आजही देशातील सामान्य नागरिक जी भाषा बोलतात,त्यात अनेक उर्दू शब्द आहेत. भाषा म्हणजे धर्म नाही.अगदी एखाद्या धर्माचेही प्रतिनिधित्व करत नाही.भाषा ही एका समुदायाची, प्रदेशाची,लोकांची असते;धर्माची नाही. असेही सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे.

# मॅटलॅब अँड सिमूलिंकवर विखे अभियांत्रिकीत कार्यशाळा



**नगर तालुका । विजय मते**

विळद घाट येथील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या यंत्र अभियांत्रिकी विभागात नुकतीच मॅटलॅब अँड सिमूलिंक' विषयावर दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. मॅटलॅब हे विविध अभियांत्रिकी शाखा जसे की यांत्रिकी अभियांत्रिकी, रोबोटिक्समधील संशोधक आणि अभियंत्यांसाठी एक महत्त्वाचे साधन आहे. ते एकात्मिक सॉफ्टवेअर वातावरणात डिझाइन आणि फाइन-ट्यून अल्गोरिदम, मॉडेल रिअल-वर्ल्ड सिस्टम आणि ऑटोमेट कोड जनरेशन सुलभ करण्यास मदत करते. मॅटलॅब डेटा, मॅटलॅब विश्लेषण, हाताळणी आणि व्हिज्युअलायझेशनसाठी शक्तिशाली साधने प्रदान करते ते डेटा क्लीनिंग, फिल्टरिंग, सांख्यिकी, प्लॉटिंग आणि परस्परसंवादी व्हिज्युअलायझेशन तयार करण्यासाठी कार्ये देते. तसेच अल्गोरिथम विकास मॅट लॅब चा वापर अल्गोरिथम विकसित आणि अंमलात आणण्यासाठी मोठ्या प्रमाणात केला जातो. 'सिम्युलिंक मॉडेलमधून सी किंवा सी++ ' कोड जनरेट करण्यासाठी सिम्युलिंक कोडर देखील वापरू शकता, जो एम्बेडेड सिस्टम किंवा हार्डवेअर प्लॅटफॉर्मवर तैनात केला जाऊ शकतो. दुसरीकडे, डेटा प्रोसेसिंग, विश्लेषण आणि व्हिज्युअलायझेशन सारख्या इतर कामांसाठी मॅट लॅब कोड जलद आणि अधिक कार्यक्षम असू शकतो. कार्यशाळेसाठी मार्गदर्शक म्हणून मॅथ वर्क्स इंडियाचे कस्टमर सक्सेस स्पेशालिस्ट हरीश मूर्ती आणि आपलिकेशन इंजिनियर डिझाईन टेक सिस्टीम प्रायव्हेट लिमिटेड पुणे चे रोहित पवार यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले. सदरील कार्यशाळेचे आयोजन यांत्रिकी विभागातील द्वितीय तृतीय तसेच अंतिम वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी केले गेले. यांत्रिकी विभागात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नेहमीच विविध कार्यशाळा राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय संशोधन परिषद विविध एक्सपर्ट लेक्चर चे आयोजन मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागामार्फत करण्यात येत असते. या दोन दिवसीय कार्यशाळेचा अजेंडा विद्यार्थ्यांना पोर्टल डेमोस्ट्रेशन ऑफ मॅट लॅब स्टुडन्ट प्रोजेक्ट्स प्रोग्रामिंग अँड डाटा विजूलायझेशन मॅथेमॅटिकल मॉडेलिंग अँड सिम्युलेशन फिजिकल मॉडेलिंग अँड सिमुलेशन इव्हेंट बेस्ड मॉडेलिंग हार्डवेअर इंटिग्रेशन अशा विविध टेक्निकल बाबींवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन आणि ट्रेनिंग देण्यासंदर्भात नियोजन करण्यात आले होते. हरीश मूर्ती यांनी मार्गदर्शन केले तर रोहित पवार दोन दिवसांत चार सत्राच्या माध्यमातून प्रत्यक्ष ट्रेनिंग द्वारे विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त हँडस ऑन एक्सपिरीयन्स कसा मिळेल हे पाहिले कार्यशाळेमध्ये सहभागी विद्यार्थ्यांनी हरीश मुर्ती,रोहित पवार यांचेशी उत्स्फूर्तपणे संवाद साधला. विद्यार्थ्यांच्या विविध शंकांचे निरसन करून समाधानकारक उत्तरे दिली. या कार्यशाळेसाठी डॉ. विखे पाटील फाउंडेशन चे सेक्रेटरी डॉ.पी. एम.गायकवाड, संचालक तांत्रिक प्रा.सुनील कल्हापुरे व अभियांत्रिकी महाविद्यालय प्राचार्य डॉ.उदय नाईक यांचे मार्गदर्शन लाभले. यंत्र अभियांत्रिकीचे विभाग प्रमुख डॉ. रवींद्र नवथर यांनी मेकॅनिकल इंजीनिअरिंग आणि मॅटलॅब अँड सिमुलिंक या संदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच या विषयाचे अभियांत्रिकीतील महत्त्व विशद करुन या कार्यशाळेमध्ये सहभागी सर्व शिक्षक,मान्यवर, विद्यार्थ्यांचे आभार मानले. कार्यशाळेच्या आयोजनासाठी प्रा.डॉ. प्रशांत नरवडे, प्रा.डॉ.कानिफ मरकड, प्रा. डॉ.सुशील मगर यांनी प्रयत्न केले. संस्थेचे चेअरमन जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी माजी खा.डॉ.सुजय विखे यांनी सहभागी विदयार्थ्यांना भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.



# शास्त्रीनगरमधील लोकांचे आरोग्य धोक्यात

## ड्रेनेजचे पाणी वाहत नसून नागरिकांच्या घरात शिरत असल्याचा आरोप

## मनपा आयुक्त हे नागरी समस्या सोडवण्यास कटीबद्ध नसल्याने जिल्हाधिकारी यांना निवेदन

**अहमदनगर । प्रतिनिधी**

महापालिका हद्दीतील केडगाव येथील शास्त्रीनगर भागातील नागरिकांच्या घरात ड्रेनेज लाईनचे घाण पाणी येत असल्याच्या निषेधार्थ नागरिकांच्या वतीने निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र कुमार पाटील यांना निवेदन देताना वैभव कदम,रुपेश कांबळे, दत्तात्रय दळवी, राम डमाळे, विलास गायकवाड, गणेश गाडे, मनोहर बनकर, शिवाजी बोरुडे, सुशांत बोरुडे, दीपक गायकवाड, सचिन वाघमारे, शुभम गायकवाड, कृष्णा काकडे, गणेश गमे, वैभव गुंजाळ, संतोष डमाळे, संतोष गायकवाड, गौरव पाटोळे, वैभव खाडे, समर्थ तांबडे, करण सुर्वे, रवी डमाळे, सुदर्शन ठोंबे, आनंद महानवर, शुभम बोरुडे, शिवाजी पळसकर, शैलेश बोरुडे, महेश राऊत, अमोल जायभाय, मंथन पावशे, रोहन कराड, ओंकार रासकर, शुभम चव्हाण, मनोज भिंगारदिवे, किरण डमाळे, अरविंद पासवान, अतुल काळे, मंगेश राशिनकर, विनायक इंगळे, भावेश फुलवाडे, करण सूर्यवंशी, राहुल काळे आदीसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुढे निवेदनात म्हटले आहे की, केडगाव शास्त्रीनगर भागात ८०० ते १ हजार लोक राहतात ६ ते ७ वर्षांपूर्वी सदर भागात ड्रेनेज लाईनचे काम करण्यात आले होते. सदरची ड्रेनेज लाईन इतके वर्ष व्यवस्थितपणे सुरू होती. परंतु गेल्या अनेक महिन्यापासून सदर ड्रेनेडलाईनचे घाण दुर्गंधीयुक्त पाणी परिसरात साचल्याने व तेच पाणी थेट नागरिकांच्या घरात येत आहे. ज्यामुळे नागरिकांच्या घरासह परिसरात घाणीचे साम्राज्य पसरलेले असून त्यामुळे या भागात घाण वास येत आहे. ज्यामुळे नागरिक हैराण झाले असून नागरिकांचे आरोग्य देखील धोक्यात आलेले आहे. यापूर्वी अनेक वेळा या भागातील नागरिकांनी महानगरपालिकेचे आयुक्त यांना निवेदन पत्र दिलेले आहे परंतु आज पर्यंत कुठल्याही प्रकारची कारवाई झालेली नाही तसेच नागरिकांचा सदरचा प्रश्न सुटलेला नाही त्यामुळे नागरिकांनी या समस्याचा निषेध व्यक्त करून निवासी उपजिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले तसेच येत्या १५ दिवसात कुठल्याही प्रकारची कारवाई झाली नाही तर आंदोलन करणार असल्याचे निवेदनात म्हटले आहे. तसेच वेळप्रसंगी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठ येथे याचिका दाखल करण्याचा इशारा वैभव कदम यांनी दिला आहे.



# आनंदी जीवन जगता आले पाहिजे- खैरे

**अहमदनगर । समीर मन्यार**

दिव्यांगाकडे पाहिले तर समजते जीवन किती कष्टमय आहे. तरीही हार मानायची नाही. आनंदी जीवन जगायचं असतं ते जगायला शिकलं पाहिजे. आनंदी जीवन जगता आलं पाहिजे .याचे हे ज्वलंत उदाहरण हे विद्यार्थी आहेत. यांची सेवा हीच खरी ईश्वरसेवा आहे दिव्यांगांचे आशीर्वाद हेच साक्षात परमेश्वराचे आशीर्वाद असल्याचे प्रतिपादन अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे यांनी केले. सावेडी येथील संजीवनी सोसायटीच्या मूकबधिर विद्यालयात दिव्यांग विद्यार्थ्यांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी केली यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे हे होते . त्यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी प्रियंका खैरे, विद्यालयाचे चेअरमन मधुकर भावले, संचालिका विद्या भावले ,मुख्याध्यापक डी के जगधने आदींसह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. पुढे बोलताना खैरे म्हणाले की भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अर्थशास्त्रतज्ञ, राजकारणीतत्त्वज्ञ आणि थोर समाज सुधारक होते. समाजापासून वंचित असलेल्या तळागाळातील समाजाला प्रवाहात आणण्याचे काम बाबासाहेबांनी केले. त्यांना अभिप्रेत असलेले काम आज ह्या विद्यालयाच्या माध्यमातून होत आहे . समाजाप्रती केलेल्या कामाचे स्मरण व्हावे आपणही त्याचे आचरण करावे यासाठी जयंती पुण्यतिथी आपण सर्वजण साजरे करतो. दिव्यांगांना समाजाच्या प्रवाहात आणण्याचे काम मूकबधिर विद्यालयाच्या मार्फत मधुकर भावले यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक करत आहे ही मोठी समाजाप्रती केलेली सेवा आहे . याच सेवेच्या माध्यमातून केलेले अभिवादन डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना असल्याचे ते म्हणाले. यावेळी विद्यालयाचे चेअरमन मधुकर भावले म्हणाले की विद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच कौशल्य विकासाचे प्रशिक्षण येथे दिले जाते. जेणेकरून हे विद्यार्थी शिक्षण घेऊन बाहेर गेल्यानंतर स्वतःचा व्यवसाय चालू करून स्वतःचा तसेच कुटुंबाचाही उदरनिर्वाह करू शकतात. हे एक भारताचे सक्षम नागरिक आहेत. त्यांना आपण सर्वांनी मिळून मदत केलीस पाहिजे. सर्वसामान्य विद्यार्थ्यांपेक्षा त्यांच्या अंगी जास्त कलागुणाचे कौशल्य आहे . त्यांना फक्त समाजाची साथ आणि योग्य मार्गदर्शनाची गरज असल्याचे ते म्हणाले.

# अलकरम हॉस्पिटलतर्फे फुले व आंबेडकर जयंतीनिमित्त शिबीर

## आधुनिक उपचारपद्धतीमुळे रोग निवारण मोठ्या प्रमाणात होते- डॉ.पटेल

**अहमदनगर । आबीद खान**

बदलती जीवनशैली आणि वातावरणातील बदलांमुळे मनुष्याची प्रतिकार शक्ती कमी होत आहे. विशेषत: लहान मुलांमध्ये आजारांचे प्रमाण वाढतांना दिसत आहे. दुषित पाणी, फास्ट फूड, अस्वच्छता यामुळे आजारांची उत्पत्ती होताना दिसते.

या वेगवेगळ्या आजारांचे निदानही अत्याधुनिक मशिनरीद्वारे करता येत असल्याने उपचार करणेही आता सोपे होत आहे. उपचार वेळेत न झाल्याने आजार बळावतात. त्यासाठी अशा मोफत तपासणी शिबीराच्या माध्यमातून आजारांचे निदान वेळेत झाल्यास त्यावर उपचार करणे सोपे होणार आहे. त्यामुळे अशा शिबीरांची गरज आहे, असे प्रतिपादन डायबटोलॉजिस्ट व कार्डीयोलॉजिस्ट डॉ. अशपाक पटेल यांनी केले. अल करम हॉस्पिटलच्या वतीने महात्मा ज्योतिबा फुले जयंती व डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त तीन दिवस मोफत सर्वरोग आरोग्य शिबीर निदान व उपचार करुन रुग्णांना औषधेही देण्यात आली. या शिबीरात प्रत्येक दिवशी ४० ते ५० रुग्णांनी याचा लाभ घेतला.



रुग्णांची तपासणी डॉ अशपाक पटेल यांनी केली. रक्त व शुगर तपासणी महेश सानप, शिफा शेख, विशाल काळे, दानिश खान, मुस्कान शेख यांनी केले. यावेळी डॉ. जहीर मुजावर, डॉ सय्यद खुसरो, डॉ. के. व्यंकटेश, शेरअली शेख आदी उपस्थित होते. प्रास्तविकात हॉस्पिटलचे डॉ जहीर मुजावर म्हणाले, आज विविध आजारांची उत्पत्ती ही हवा, पाणी, खाण्यातून होताना दिसते. धकाधकीचे जीवन, वेळेवर न जेवणे, दुषित अन्न-पाणी, कोल्ड्रिंक, फास्टफूड यामुळे बऱ्याच जणांना पोटाचे विकार होतात. यासाठी नियमित व्यायाम, संतुलीत आहार महत्वाचा आहे. प्रत्येकाने आपली प्रतिकार शक्ती वाढविण्याची गरज आहे. तसेच छोट-छोट्या व्याधींकडे दुर्लक्ष न करता नियमित तपासणी केल्यास भविष्यात उद्‌भवणारे आजारांवर वेळीच निदान होऊ शकते. यासाठीच मोफत तपासणी शिबीराच्या माध्यमातून रुग्णांना दिलसा देण्याचे काम अल करम हॉस्पिटलच्यावतीने करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.या शिबीरात हॉस्पिटलच्या नर्सिंग स्टाफ, टेक्निशियन, कर्मचारी यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शेरअली शेख यांनी केले. तर आभार एजाज तांबोली यांनी मानले.

# डॉ. हराळ यांना यंग रिसर्चर पुरस्कार



**अहमदनगर । विजय मते**

अहिल्यानगरचे प्रसिध्द नेत्ररोग तज्ञ डॉ. सौरभ हराळ यांना दिल्ली येथे झालेल्या आशिया-पॅसिफिक अकादमी ऑफ ऑप्थाल्मोलॉजी (झज) परिषदेत 'यंग रिसर्चर वॉर्ड'ने सन्मानित करण्यात आले या प्रसंगी डॉ.नम्रता शर्मा,डॉ. पार्थ बिस्वास,डॉ.प्रशांत बावनकुळे,डॉ. संतोष होनावर आदी उपस्थित होते. डॉ.हराळ यांना डोळ्यांच्या ॲलर्जीवरील नवीन उपचार पद्धतीच्या संशोधनासाठी हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. डॉ. सौरभ हराळ यांनी 'इंटरफेरॉन अल्फा २ ल' या नवीन औषधांवर संशोधन केले. जे पारंपरिक उपचारांपेक्षा अधिक प्रभावी ठरले. डोळ्यांची ॲलर्जी ही एक सामान्य पण त्रासदायक समस्या असून लहान मुलांपासून प्रौढांपर्यंत अनेकांना याचा त्रास होतो. सध्याच्या उपचारांमध्ये तात्पुरता आराम मिळतो, पण औषध थांबवल्यावर त्रास परत होतो.डॉ.सौरभ हराळ यांच्या संशोधनाने या अडचणीवर प्रभावी आणि दीर्घकालीन उपाय मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या परिषदेत जगभरातील नेत्ररोगतज्ज्ञांनी आपले संशोधन सादर केले होते. यामधे डॉ.सौरभ हराळ हे सर्वात तरुण संशोधक होते.त्यांचे मूळ गाव अहिल्यानगर असून त्यांनी दिल्लीत तीन वर्षेयशस्वी प्रॅक्टिस केल्यानंतर आता अहिल्यानगर येथे सावेडी मधे प्रोफेसर कॉलनी चौकात हराळ नेत्रालयाच्या माध्यमातुन सेवा देत आहेत.

एम.एस. परीक्षेत सुवर्णपदक मिळवणारे डॉ. हराळ हे आपल्या जिल्ह्यासह राज्यासाठी भूषण ठरले आहेत. डॉ.सौरभ हराळ यांच्या या उल्लेखनीय यशामुळे अहिल्यानगरचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर उजळले आहे.त्यांच्या संशोधनामुळे डोळ्यांच्या ॲलर्जीने त्रस्त रुग्णांना मोठा दिलासा मिळेल. असा विश्वास व्यक्त होत आहे.

रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक

भाड्याने देणे
परिचय हॉटेलजवळ, बालिकाश्रम रोडवर कॉर्पोरेट ऑफिस, बँक, शोरूम, क्लिनिक आदींसाठी ८०० स्क्वेअर फुटाचे दोन मजले बांधलेली जागा भाड्याने देणे आहे.
- संपर्क -
८८८८३४७४११

निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

मे. रुपाली एजन्सी
फुड प्रॉडक्ट मटेरियल सप्लायर्स
राधिका लॉजजवळ, तापकीर लेन, आडत बाजार, अहमदनगर - ४१४००१.
(०२४१) २३४३०६०, ९८२२८४३०६०
ई-मेल - rupaliagency@gmail.com

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ, 7774001800, समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा, 9373021584, गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक, 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)






# हजरत काजीबाबा यांचा ३ दिवस उरूस

## १ मे संदल, २ व ३ मे रोजी बहारदार कार्यक्रम

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी शहरातील हजरत काजीबाबा यांचा ता. १ ते ३ मे २०२४ असा सलग तीन दिवस संदलसह बहारदार कव्वाल्यांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असल्याची माहिती प्रमुख संयोजक श्रीरामपूर नगरपरिषदेचे माजी नगरसेवक हाजी मुजफ्फर शेख व उरूस कमेटीचे अध्यक्ष श्रीरामपूर नगरपालिकेचे माजी ज्येष्ठ उपनगराध्यक्ष दिलीप नागरे आणि फतेह ग्रुपचे अध्यक्ष दानिश शेख यांनी दिली. प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, गुरूवार ता.१ ते शनिवार ता.३ मे २०२५ असा सलग ३ दिवस या उरूसनिमित कव्वाल्यांचा उत्सव चालणार आहे. गुरूवार ता. १ मे २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजता श्रीरामपूर नगरपालिकेचे माजी जेष्ठ नगरसेवक पैगंबर वासी पापा जलालभाई शेख यांच्या निवासस्थानासमोरून भव्य अशा संदल मिरवणुकीस प्रारंभ होणार आहे. शुक्रवार ता. २ मे २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता नागपूर येथील जुबेर सुलतानी तसेच मुंबई येथील नुसरत खानम आणि शनिवार ता. ३ मे २०२५ रोजी मुंबई येथील अदनान अजीम नाझा आणि बुऱ्हानपूर येथील तनवीर कौसर यांचा कव्वाल्यांचा बहारदार कार्यक्रम होणार आहे. मुळा प्रवरा वीज संस्थेचे माजी संचालक , माजी नगरसेवक शहीद आयुबभाई शेख चौकातील फतेह मैदानावर हा ऊरुसाचा कार्यक्रम होणार आहे.

उरूस यशस्वीतेसाठी फतेह यंग सर्कल, सरकार ग्रुप, अल्बा ग्रुप, सुभेदार सोशल ग्रुप, अल्नुर युथ फौंडेशन, के.जी. एन. ग्रुप, एकता यंग सर्कल, संजेरी फ्रेंड ग्रुप, मौलाना आझाद युथ फौंडेशन, एस.के. ग्रुप, गरीब नवाज फौंडेशन, अल्कुरेश ग्रुप आदि प्रयत्नशील आहेत. उरूस निमित्त आयोजीत कव्वाल्यांचा भक्तांनी लाभ घ्यावा, असे आवाहन उरुस कमेटीचे प्रमुख संयोजक श्रीरामपूर नगरपरिषदेचे माजी नगरसेवक हाजी मुजफ्फर शेख, उरूस कमेटीचे अध्यक्ष श्रीरामपूर नगरपालिकेचे माजी ज्येष्ठ उपनगराध्यक्ष दिलीप नागरे आणि फतेह ग्रुपचे अध्यक्ष दानिश शेख यांच्यासह एजाज इनामदार, लाल पटेल, हाजी राज मोहमद रुस्तुमभाई, बाबा इनामदार, पत्रकार हाजी शफीक बागवान, अश्फाक शेख, बरकतअली शेख, असलम बिनसाद, मेहबूब कुरेशी,संजय फंड, अशोक नाना कानडे, आसिफ दारूवाला, श्रीनिवास बिहाणी, संजय छल्लारे, ॲड.सादिक शिलेदार, ॲड.तुषार चौदंते, ॲड. सौरभ गदिया ॲड.एजाज पठाण इकबाल भाई घडीवाले, रमजान शाह,गोरख साळुंखे, विकी शर्मा, शाहरुख बागवान, फिरोज मुलानी, विनोद गुप्ता, हाजी मतीन शेख, शाहरुख बागवान, तनवीर पांडे, जयेश सावंत, अल्ताफ शेख, हमीद पटेल, गफार पोपटीया, राजू मिर्झा, फिरोज मुलानी, सलीम टर्नर, हाजी मतीन शेख, जाकीर जहागीरदार, रशीद पांडे, दिनमोहमद शेख, समीर खान, शाहिद कुरेशी, मुख्तार काझी, इरफान जीवनी, अजय कदम, मनोज गुप्ता, सागर घोरपडे, पप्पू खान, विकी शर्मा, आशिक अली, नाजीम पिरजादे आदींनी केले आहे.

# यशवंत पुलाटे यांना स्व. हिराचंद ब्राह्मणे स्मृती साहित्य पुरस्कार प्रदान



**श्रीरामपूर । सलीमखान पठाण**

दुर्गापुर ता.राहता येथील ग्रामीण साहित्यिक व कवी, शारीरिक मर्यादांच्या महामार्गावर यशस्वी वाटचाल करणारे यशवंत पुलाटे हे प्रवरा परिवाराच्या सामाजिक,सांस्कृतिक, आर्थिक व शैक्षणिक विकासाचे उत्तम सकारात्मक उदाहरण आहेत असे मत अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष शालिनीताई विखे यांनी व्यक्त केले.

स्वर्गीय हिराचंद ब्राह्मणे यांच्या प्रथम स्मृतीदिनानिमित्त शब्दगंध साहित्यिक परिषद राहाता तालुक्याच्या वतीने यशवंत पुलाटे यांना स्वर्गीय हिराचंद ब्राह्मणे स्मृती साहित्य पुरस्कार प्रदान करण्यात आला त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी विचारपिठावर शब्दगंध साहित्यिक परिषदेचे संस्थापक सचिव सुनील गोसावी,ज्येष्ठ साहित्यिक प्रा.डॉ. बाबुराव उपाध्ये,माजी पोलीस अधिकारी कवी सुभाष सोनवणे,माजी प्राचार्य डॉ. पवार, संयोजक व राहाता पंचायत समितीचे माजी सदस्य संतोष ब्राह्मणे आदि उपस्थित होते

यशवंत पुलाटे यांनी परमाणू विज्ञान अभियांत्रिकी पदविका प्राप्त केलेली आहे व ते महात्मा फुले विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय दाढ बु येथे प्रयोगशाळा सहाय्यक पदी कार्यरत होते. त्यांच्या कार्याची अनेक राज्य पातळीवरील संस्थानी दखल घेवून त्यांना पुरस्कार देवून गौरविले आहे. त्यामध्ये प्रामुख्याने जागतिक मानवाधिकार संघटना ठाणेचा 'साहित्य सौरभ' राज्य साहित्य पुरस्कार, महाराष्ट्र साहित्य परिषदेचा स्व. शांतिकुमार फिरोदीया साहित्य पुरस्कार अ.भा.शेतकरी साहित्य महामंडळाचा विश्वस्तरीय काव्यलेखन पुरस्कार श्रद्धा ग्राम प्रतिष्ठानचा साईरत्न साहित्य सेवा पुरस्कार आदीं पुरस्कारांचा यामध्ये समावेश आहे. तसेच संजीवनी खोजे राज्य पुरस्कार निवड समितीचे सद्स्यपद, महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या श्रीरामपूर शाखेच्या जिल्हा कविसमेलन अध्यक्षपद, साहित्य अकादमी मुंबई कविसंमेलनात निमंत्रित कवी म्हणून सहभाग राहिला आहे. महाराष्ट्रातले मान्यवर दिवाळी अंक , आकाशवाणी, दूरदर्शन ,मान्यवर वृत्तपत्रे विभागीय व अखिल भारतीय साहित्य संमेलने यामधील त्यांचा साहित्य सहभाग दुर्गापुरचा व प्रवरा परिवारचा अभिमानाचा विषय ठरला आहे कारण ते स्वतः ची ओळख अभिमानाने मेड इन प्रवरा अशी करून देणारे प्रवरेचे साहित्यिक व सर्व शिक्षण प्रवरेच्या विद्यालय व कॉलेजमध्ये घेतलेले विद्यार्थी आहेत. जागतिक मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने घेण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय ऑन लाईन कवी संमेलनात त्यांच्या नगरी बोलीतील सालचंदीचे वैभव ही कविता स्वतः मागवून जागतिक कीर्तीचे शास्त्रज्ञ व पिलानी इन्स्टिट्यूट राजस्थानच्या सोशल इलेक्ट्रॉनिक विभागाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ भाऊसाहेब बोत्रे यांनी जागतिक व्यासपीठावर सादरीकरण करून अनोखा गौरव केला. कुसुमाग्रज व पद्मभूषण बाळासाहेब विखे पाटील यांनी गौरविलेला 'जन्मझूला' हा कवितासंग्रह प्रकाशित केला आहे. प्रवरा कामयुनिटी रेडिओची संकेत धून नाते जुळवू या मातीच्या मनाशी या आज ग्लोबल झालेल्या रेडिओमुळे देशाबाहेर पोहचली आहे. साहित्यिक,सांस्कृतिक , अध्यात्मिक व शैक्षणिक क्षेत्रातिल एक सहज संवादी व्यक्तिमत्व म्हणून ते परिचित आहेत.ग्रामीण माती आणि माणसे हा त्यांच्या जिव्हाळ्याचा विषय असल्यामुळे त्यांनी 'नगरी माणसे व नगरी बोली' ला प्रतिष्ठित करण्याचा प्रयत्न मान्यवर दैनिकाच्या स्तभ् लेखनातून सलग चार वर्षे त्यांनी केला.

त्यांच्या साहित्यिक कार्याचा गौरव शब्दगंध चे सुनील गोसावी व प्रा. डॉ. बाबुराव उपाध्ये यांनी केला. यावेळी भास्कर दादा लगड, फ्रान्सिस पाळंदे,सुमेध ब्राह्मणे,सुमेध वाघमारे, डॉ संदीप तापसे, आनंदा साळवे आदी उपस्थित होते.

# डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त महाआरोग्य शिबिर

**नेवासा । विजय खंडागळे**

महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त तसेच आयुष्यमान आरोग्य वर्धिनी केंद्र संकल्पनेला ७ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने, प्रा. आरोग्य केंद्र सोनई येथे महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमाचे आयोजन डॉ. बाबासाहेब आंबेडकर फाउंडेशन, सोनई आणि आयुष्यमान भारत यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन आंबेडकर फाउंडेशनचे संचालक सचिन पवार यांच्या हस्ते संपन्न झाले. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. संतोष विधाते उपस्थित होते. त्यांनी नागरिकांना रक्तदाब, मधुमेह व कर्करोग यांसारख्या आजारांबाबत सजग राहण्याचे आवाहन केले. नुकत्याच नियुक्त झालेल्या वैद्यकीय अधिकारी डॉ. क्षितिजा इंगळे यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

शिबिरात ३० पुरुष आणि २२ महिलांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैशाली अकोलकर यांनी केले. यावेळी अरुणा म्हस्के, गौरव भागवत (हिंद लॅब तज्ञ), राजेश नगरे, डॉ. शरयू माळी, आरोग्य सेवक राजेंद्र पाटोळे, वैभव लष्करे, आशाताई सुनिता व सुवर्णा कल्हापुरे, संगीता पाडळे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष सचिन पवार यांनी सांगितले की, माजी सरपंच दादासाहेब वैरागर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थापन झालेल्या आंबेडकर फाउंडेशनच्या माध्यमातून समाजोपयोगी उपक्रम राबवले जात आहेत. भविष्यात गरजू



रुग्णांना वैद्यकीय व आर्थिक मदत, अँब्युलन्स सेवा आणि स्वच्छता मोहिमा यांद्वारे ग्रामीण आरोग्य व्यवस्था मजबूत केली जाईल.

# महावितरणचे उत्तर दक्षिण असे दोन स्वतंत्र कार्यालय व्हावे- कोल्हे

## फडणवीसांनी कार्यवाहीसाठी केल्या सूचना

**कोपरगाव । किसन पवार**

अहिल्यानगर जिल्ह्यात महावितरणचे अधिक्षक अभियंत्याचे दोन स्वतंत्र सर्कल कार्यालयाची मागणी सहकार महर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष युवानेते विवेक कोल्हे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली असता त्यांनी हा प्रश्न सोडविण्याची कार्यवाही सूचना संबंधित विभागाला केली आहे. त्यामुळे या निर्णयाचे सर्वच स्तरातून स्वागत होत आहे. अहिल्यानगर जिल्हा भौगोलिकदृष्ट्या अतिशय व्यापक आहे.

१४ तालुक्यात सुमारे ११ लाख १४ हजार वीज ग्राहकांची संख्या आहे. शेती,गृह,व्यावसायिक, औद्योगिक वापराचे ग्राहक यात असून अधीक्षक अभियंत्याचे सर्कल ऑफिस हे सध्या एकच असून त्यामुळे शेवटच्या तालुक्यातील नागरिकाला आपली समस्या सोडवून घेण्यासाठी थेट १२५-१५० किमी पर्यंत अंतर पार करावे लागते हे अत्यंत गैरसोयीचे आहे त्यामुळे उत्तर आणि दक्षिण असे दोन स्वतंत्र कार्यालय निर्माण झाल्यास मोठा प्रश्न सुटेल अशी मागणी युवानेते विवेक कोल्हे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केलेली होती त्यास सकारात्मक प्रतिसाद त्यांनी दिला असून यावर कार्यवाही करण्याची सूचना संबंधित विभागाला केली आहे. महावितरण विभागाने देखील तातडीने सकारात्मक पावले उचलत सदर प्रश्न समजावून घेत त्यावर उचित कार्यवाही सुरू केली आहे.



ग्रामीण भागातील नागरिकांना मोठ्या अंतरावर प्रवास करून काही कामे पूर्ण करणे जिकिरीचे होत असल्याने हा प्रश्न जिव्हाळ्याचा बनला आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी नेहमी सामान्य जनतेला होणारा त्रास कमी करून शासनाने दिलेल्या सोयी सुविधा अधिक तत्पर कशा देणे शक्य होईल यावर अनेक ठोस निर्णय घेतले आहेत. या प्रश्नात देखील त्यांनी लक्ष घातल्यामुळे लवकरच हा प्रश्न सुटून नागरिकांना दिलासा मिळेल अशी भावना विवेक कोल्हे यांनी व्यक्त केली आहे.

# दिपाली फरगडेंना आदर्श सरपंच पुरस्कार



**श्रीरामपूर । शफीक बागवान**

भैरवनाथनगर ग्रामपंचायतीच्या लोकनियुक्त सरपंच दिपाली फरगडे यांना स्वराज्य सरपंच सेवा संघाच्या वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय आदर्श सरपंच २०२५ पुरस्कार सिने अभिनेते मकरंद अनासपुरे यांच्या हस्ते आणि सरपंच सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष बाबासाहेब पावसे, ग्रामसेवक संघटनेचे राज्य अध्यक्ष एकनाथ ढाकणे यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला. दिपाली फरगडे यांच्या केलेल्या कार्याची दाखल घेऊन हा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. या प्रसंगी श्रीरामपूर नगरपालिका शिक्षण मंडळातील निवृत्त आदर्श मुख्याध्यापक नवनाथ अकोलकर भैरवनाथनगर ग्रामपंचायत सदस्य पांडुरंग लबडे, अलका वायकर, ज्योती लाहोरे, सिमा शिंदे, कांता शेळके, वैशाली फरगडे, सपना सोनार, मनिषा शिंदे, यासीन शेख, ज्योती लबडे, मनिषा चौधरी, छाया थोरात,सविता आढाव, कोमल फटांगरे, शारदा जाधव, खादी ग्रामोद्योगचे व्हा.चेअरमन प्रविण फरगडे, राजेंद्र फरगडे, विजय शिंदे, आरोग्य अधिकारी सुभाष शेळके, श्रीराम फरगडे, अविनाश लबडे , नितीन लबडे, उमेश लबडे, भागिनाथ गुंड आदि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरणची कामे तातडीने पूर्ण करा- संभाजी माळवदे

## कार्यकारी अभियंता कार्यालयास टाळे ठोकण्याचा इशारा



**नेवासा । विजय खंडागळे**

तालुक्यातील तसेच जिल्ह्यातील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणची कामे तातडीने पूर्ण करा व कामास विलंब करणाऱ्या ठेकेदारावर कठोर कारवाई करा अन्यथा अहिल्यानगर येथील कार्यकारी अभियंता कार्यालयास टाळे ठोकण्याचा ईशारा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे संभाजी माळवदे यांनी निवेदनाद्वारे दिला. अहिल्यानगर जिल्ह्यात व नेवासा तालुक्यात पाणी पुरवठ्याची हजारो कोटीची कामे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अंतर्गत सुरु आहे. यात सात ते दहा गावे मिळून एक योजना अशा योजनाची कामे सुरु आहेत. यात पाणी साठवण टाक्या,पाण्याच्या सोअर्स पासून गावापर्यंत पाईप लाईन टाकणे , गावातील अंतर्गत पाईप लाईन टाकणे अशा कामाचा समावेश आहे. मोठया करोडोच्या बजेटची कामे असणाऱ्या या योजना काही केल्याने पूर्णत्वास जाण्यासाठी तयार नाही. या योजनाचा पूर्णत्वाचा कालावधी देखील उलटून गेला आहे.

कालावधी उलटून वर्ष होण्यास आली आहेत. टाक्यांचे कामे अपूर्ण आहेत. पाणी सोअर्स पासून पाईप लाईन टाकण्याचे काम अपूर्ण आहे. गावातील अंतर्गत लाईन टाकण्यास सुरुवातच झाली नाही याला कारण म्हणजे ठेकेदारांचा हलगर्जीपणा व यांना पाठीशी घालणारे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे अधिकारी कामे पूर्ण न झाल्याने ऐन उन्हाळ्यात नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी झगडाव लागत आहे.

हजारो कोटीच्या योजना, कोटीच्या कोटी बिले काढून सुद्धा काम अपूर्णच. या सर्व कारभाराची दखल घेत महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे संभाजी



माळवदे यांनी अहिल्यानगर येथे एमजेपीचे कार्यकारी अभियंता यांची भेट घेऊन नेवासा तालुक्यातील जीवन प्राधिकरणची कामे तातडीने सुरु करा तसेच मागील पाच वर्षात जी कामे केली आहेत त्या कामाची गुणवत्ता तपासणी करण्यात यावी, सद्यस्थितीत सुरु असलेल्या कामास विलंब करणाऱ्या ठेकेदारावर कठोर कारवाई करण्याची मागणी निवेदन द्वारे केली. वेळीच कारवाई न केल्यास अहिल्यानगर येथील एमजेपीच्या कार्यालयास टाळे ठोकून कार्यालयसमोर बेमुदत धरणे आंदोलन करण्याचा ईशारा यावेळी कार्यकारी अभियंता यांना लेखी निवेदन देऊन दिला. निवेदनावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे संभाजी माळवदे, नेवासा काँग्रेसचे शहराध्यक्ष अंजुम पटेल, बसपाचे युवा नेते हरीश चक्रनारायण, गुलाब पठाण, काँग्रेस उपाध्यक्ष सतीश तऱ्हाळ,भारतीय स्वाभिमानी संघांचे गणपत मोरे, काँग्रेसचे संदीप मोटे आदी उपस्थित होते.

# मान्सूनचा सुखद सांगावा

मागील काही वर्षात दुष्काळाने पिचलेल्या महाराष्ट्राला भारतीय हवामान खात्याने सुखद धक्का दिला आहे. भारतीय हवामान खात्याने यावर्षी पडणाऱ्या पावसाचा अंदाज वर्तवला आहे. हा अंदाज बळीराजासाठी सुखावणारा आहे. कारण यावर्षी सरासरीपेक्षा अधिक (१०५) टक्के इतका पाऊस पडेल असा अंदाज भारतीय हवामान खात्याने वर्तवला आहे. या अंदाजात पाच टक्के कमी अधिक तफावतीची शक्यता गृहीत धरण्यात आली आहे याचाच अर्थ यावर्षी १०० ते ११० टक्के पावसाची शक्यता आहे. देशाच्या उत्तर आणि ईशान्य भागात तसेच महाराष्ट्रासह दक्षिण भागाती सरासरी इतका किंवा सरासरीपेक्षा अधिक पाऊस पडेल असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. यावर्षी संपूर्ण महाराष्ट्रावर वरुण राजाची कृपा राहणार असून कायम दुष्काळग्रस्त असणाऱ्या मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रातही पावसाचे प्रमाण अधिक असण्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. हवामान खात्याच्या या अंदाजाने राज्यातील बळीराजा सुखावला आहे. हा अंदाज बळीराजासाठी जितका सुखावणारा आहे तितकाच तो उद्योग जगतासाठीही सुखावणारा आहे. कारण कोरोनामुळे उद्योग जगताची घसरलेली गाडी अजूनही सावरलेली नाही. त्यात मागील दोन वर्ष राज्यावर दुष्काळाचे सावट होते. मराठवाडा आणि विदर्भात दुष्काळसदृश परिस्थिती होती त्याचा उद्योग जगतावर देखील मोठा परिणाम झाला आहे. भारत हा कृषिप्रधान देश आहे. भारताची अर्थव्यवस्था प्रामुख्याने शेतीवरच अवलंबून आहे. शेती हाच भारताच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. आजही देशाची ६० टक्के लोकसंख्या ही शेतीवरच अवलंबून आहे. त्यामुळे तिच्या स्थैर्यासाठी आणि विकासासाठी शेतीचे विशेष महत्व आहे. मागील काही वर्ष देशात दुष्काळ पडला होता. त्याचा परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर झाला होता. कोरोनामुळे देशातील अनेक उद्योग ठप्प पडले होते त्यामुळे देशाचा जिडीपी ही घसरला होता अशावेळी शेती क्षेत्राने देशाला वाचवले होते. कोरोना गेल्यानंतर सर्व काही सुरळीत होईल अशी अपेक्षा असतानाच मागील दोन वर्ष देशात आणि राज्यातील काही भागात भीषण दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली होती. या वर्षी राज्यात समाधानकारक पाऊस पडला असला तरी राज्यातील काही भागात दुष्काळसदृश परिस्थिती होती. दुष्काळसदृश परिस्थितीमुळे राज्यात भीषण पाणी



टंचाई निर्माण झाली आहे. राज्यातील पाणी साठा संपत आला आहे. नद्या कोरड्या पडल्या आहेत. धरणे आटली आहे. बोअरवेलला पाणी लागत नाही. नागरिकांना वापरण्यासाठी सोडा पण पिण्यासाठी देखील पाणी मिळत नाही. एका एका हंड्यासाठी नागरिकांना कैक किलोमिटरची पायपीट करावी लागत आहे. शहरातही काही भागात टँकर चालू आहे. राज्यातील काही भागात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याने शेतीलाही पाणी मिळणे मुश्कील झाले आहे. अशावेळी सर्वांच्या नजरा हवामान खात्याच्या अंदाजाकडे लागल्या होत्या. सुदैवाने हवामान खात्याचा सुखद अंदाज आल्याने राज्यातील दुष्काळग्रस्त नागरिकांना सुखद धक्का बसला आहे. यावर्षी सरासरीपेक्षा अधिक पाऊस होणार असल्याने भरघोस पीक येऊन रान आबादानी होणार आहे. शिवाय राज्यातील नागरिकांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही मिटणार आहे. जर हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार पाऊस झाला तर उद्योग जगतावर ही त्याचा सकारात्मक परिणाम होईल. एकूणच हवामान खात्याने वर्तवलेला मान्सूनचा हा सुखद अंदाज सर्वांनाच सुखावणारा आहे.



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

**समाजसंवाद**

# आदिकांनी घेतली अजित पवारांची भेट

**श्रीरामपूर । सलीमखान पठाण**

मंगळवारी राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष,राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेतली.यावेळी अजित पवार यांच्या समवेत पक्ष संघटना बद्दल आणि विविध विकास कामाच्या अनुषंगाने सकारात्मक चर्चा संपन्न झाली.

श्रीरामपुरात घडत असलेल्या घडामोडींची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कानावर घातल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसचे सरचिटणीस व राष्ट्रीय प्रवक्ते अविनाश आदिक यांनी सांगितले. मंगळवारी सकाळी अविनाश आदिक यांनी अजित पवार यांची भेट घेतली, यावेळी माजी नगराध्यक्षा अनुराधा आदिक याही उपस्थित होत्या. दहा नगरसेवकांचे भाजप प्रवेशाकडे आणि



अविनाश आदिक यांचे लक्ष वेधले असता अविनाश आदिक म्हणाले त्यात धक्कादायक काही नाही. बऱ्याच दिवसापासून याविषयी सुरू होता मात्र त्याला मुहूर्त आज मिळाला हे नक्की. ते सर्व काँग्रेसला सोडून भाजपमध्ये का आले हे सर्वांना माहीत आहे परंतु आता ते महाविकास आघाडी सोडून महायुतीत येत असल्याने मित्र पक्ष म्हणून आम्ही त्यांचे स्वागत करतो.

आगामी नगरपालिकेच्या निवडणुकीत नगराध्यक्षपदाची जागा ही राष्ट्रवादी काँग्रेसला कायम राहणार का असे विचारले असता अद्यापपर्यंत नगराध्यक्षपदाचे सोडत निघालेली नाही ही जागा आरक्षित होते की जनरल राहते हे पहावे लागेल जागा जनरल राहिली तर याबाबत निर्णय घेता येईल कारण अनुराधा आदिक या लोकप्रिय नगराध्यक्ष ठरलेल्या आहेत मात्र जोपर्यंत नगराध्यक्ष पदाचे आरक्षण ठरत नाही तोपर्यंत याबाबत अधिक बोलणे योग्य नाही श्रीरामपूरच्या घडामोडीची इत्यभूत माहिती आपण अजित पवार यांना दिली असून पक्ष वाढीसाठी राष्ट्रवादीत कोणी येत असेल तर त्याचा स्वागत करू असेही दादांनी सांगितल्याचे अविनाश आदिक म्हणाले.

अविनाश आदिक यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना शहराच्या विकास कामाबद्दल तसेच नवीन कामे सुरू करण्याबाबत याच बरोबर अतिक्रमणामुळे झालेल्या विस्थापितांना मदत करण्याबाबत चर्चा केली असल्याचे अविनाश आदिक यांनी सांगितले.

## माळीवाडा बसस्थानक कामात दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करा- रोकडे

**अहमदनगर । प्रतिनिधी**

अहिल्यानगर शहराच्या दृष्टीने परिवहनासाठी महत्त्वाचे असलेले माळीवाडा बसस्थानक जुनी धोकादायक इमारत पाडून नवीन इमारतीचे काम हे काही महिन्यांपूर्वी सुरू झाले. पण अहिल्यानगर महानगरपालिकेच्या काही विभागातील अधिकाऱ्यांमुळे हे काम रखडले गेले.



यामुळे माळीवाडा बस स्थानकातून प्रवास करणारे शहरातलेच नव्हे तर जिल्ह्यातले तसेच राज्यातील सर्व प्रवाशांना याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. निधी मंजूर असताना सुद्धा संबंधित अधिकाऱ्याकडून कामासंबंधी तत्परता दिसून येत नाही. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करून, जे कोणी या कामात दिरंगाई करत असेल अशा अधिकाऱ्यांची बदली करून त्या जागी नवीन सक्षम व कार्यक्षम अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी अशी मागणी करणारे निवेदन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने शहर उपाध्यक्ष किरण रोकडे यांनी जिल्हाधिकारी यांना दिले. तसेच याबाबत लवकरात लवकर निर्णय न घेतल्यास महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे शहराध्यक्ष गजेंद्र राशिनकर यांच्या मार्गदर्शनाखाली तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल असा इशारा मनसेच्या वतीने देण्यात आला.

## प्रहार दिव्यांग संघटनेचा माजी राज्यमंत्री प्राजक्त तनपुरेंच्या आंदोलनास पाठिंबा

**राहुरी । दत्ता जोगदंड**

येथील छत्रपती शिवाजी महाराज मुर्ती विटंबना झाल्या प्रकरणी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाची गांभिर्याने दखल घेऊन जनतेच्या भावना लक्षात घेत ठोस पावले उचलावी.

ज्या नराधमाने हे कृत्य केले त्याला लवकरात लवकर पकडून कठोर शिक्षा द्यावी, अशी मागणी प्रहार दिव्यांग संघटनेचे उत्तर जिल्हाध्यक्ष मधुकर घाडगे, सल्लागार सलीमभाई शेख, समन्वयक आप्पासाहेब ढोकणे, तालुकाध्यक्ष योगेश लबडे राहुरी तालुका प्रहार दिव्यांग संघटनेच्या वतीने करण्यात आली. राहुरी शहरातील बुवासिंद बाबा तालिम येथे हिंदवी स्वराजेचे हिंदवी शिल्पकार छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अर्धकृती पुतळ्याची समाजकंटकानी विटंबना केल्याच्या घटनेला २० दिवस उलटले तरी अद्यापही या प्रकरणातील दोषींवर कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने नागरिकामधे तीव्र असंतोष पसरला आहे. घटनेच्या निषधार्थ माजी राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे यांनी ता.१४ एप्रिलपासुन शनी चौकात बेमुदत उपोषण आंदोलन सुरू केले. या बेमुदत उपोषण



आंदोलनास प्रहार दिव्यांग संघटनेच्या पदाधिकारी यांनी भेट दिली. जाहिर पाठिंबा दिला. या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन दोषींना अटक करून कठोर शिक्षा देण्यात यावी, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केली.

यावेळी राहुरी शहराध्यक्ष जुबेर मुसानी, दवणगाव शाखाध्यक्ष नानासाहेब खपके, पाराजी भोसले, विजय म्हसे, माणिक तारडे आदी उपस्थित होते.

## १८ एप्रिल रोजी राष्ट्रवादी सामाजिक न्याय विभागाची बैठक

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

### २२ एप्रिल पुणे विभाग तर २४ एप्रिल रोजी कोकण विभागाची बैठक

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या सामाजिक न्याय विभागाने संघटन मजबूतीसाठी उत्तर महाराष्ट्राच्या नाशिक विभागाची बैठक शुक्रवार ता. १८ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ११ वाजता श्रीरामपूर येथील माजी आमदार लहू कानडे यांच्या कार्यालयातील सभागृहामध्ये आयोजित करण्यात आली असल्याची माहिती प्रदेशाध्यक्ष प्रा. सुनील मगरे आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ उपाध्यक्ष तथा या विभागाचे राज्य प्रभारी मा. आ. लहू कानडे यांनी दिली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सर्वसामान्यांच्या विकासासाठी महायुती सोबत सत्तेमध्ये आहे.

तथापी पक्ष नेतृत्वाने शिव, शाहू, फुले आंबेडकरांचा पुरोगामी विचार पक्षाचा आत्मा असल्याचे स्पष्ट केले आहे. पार्टीमध्ये यासाठीच तळागाळातील समाज घटकांना मुख्य प्रवाहामध्ये सामील होता यावे आणि सत्तेच्या माध्यमातून अनुसूचित जाती जमाती व भटक्या विमुक्तांचे महत्त्वाचे प्रश्न सुटावेत व दैनंदिन जगणे सुकर व्हावे यासाठी सामाजिक न्याय विभागाची स्थापना करण्यात आली आहे.

सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून तळागाळातील माणूस राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीसोबत जोडण्याचा प्रयत्न असतो. यासाठीच विभागीय बैठकांच्या माध्यमातून संघटनेची सद्यस्थिती समजून घेणे, व शिव, शाहू, फुले, आंबेडकरांचे विचार कार्यकर्त्यांमध्ये रुजविणे आणि गोरगरिबांची कामे करण्यासाठी कार्यकर्त्यांना प्रशिक्षित करणे हा उद्देश ठेवून या आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. २०२५ हे वर्ष भारतीय संविधानाचे अमृत महोत्सवी वर्ष आहे. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष मा.खा. सुनील तटकरे यांनी आंबेडकर जयंती दिनापासून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने आम्ही बाबासाहेबांचे पाईक अभियानाची घोषणा केली आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला दिलेल्या मानवी हक्क, समता, न्याय आणि बंधुता या मूल्यांच्या बाबत कृती कार्यक्रम दिला आहे. सामाजिक न्याय विभाग प्रत्येक जिल्ह्यामध्ये या कार्यक्रमाचा भाग म्हणून संविधान गौरव मेळावे घेणार आहे.

यामधून संविधान उद्देशिकेचे वाटप आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जनतेला उद्देशून लिहिलेल्या पत्राचे वाटप करण्यात येईल. तसेच विविध व्याख्याने व सांस्कृतिक कार्यक्रम देखील आयोजित करण्यात येतील. विभागीय बैठकांमध्ये प्रदेशाध्यक्ष प्रा. सुनील मगरे व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे वरिष्ठ उपाध्यक्ष आणि ज्येष्ठ लेखक लहू कानडे मार्गदर्शन करणार आहेत. २२ एप्रिल रोजी पुणे विभाग तर २४ एप्रिल रोजी कोकण विभागाची बैठक होणार आहे. इतर विभागाच्या बैठका देखील या महिना अखेर संपन्न होतील. या बैठकांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन करावे असे आवाहन पक्षाच्या वतीने करण्यात आले आहे.

## मशिदीत प्रवचन आणि मंदिरात तकरिर व्हावी- ह.भ.प.सोन्नर

**अमरावती । प्रतिनिधी**

मशिदीत जाताना कीर्तनकारांना आणि मंदिरात जाताना मौलानांना भिती वाटू नये. मशिदीत संत साहित्यावर कीर्तन व्हावे आणि मंदिरात कुराणावर तकरिर व्हावी. मशिदीत मौलाना मार्गदर्शन करतात त्याला तकरिर म्हणतात. त्यातून हिंदू-मुस्लीम यांच्यात एकमेकांच्या धर्माबद्दल असणारे गैरसमज दूर होतील आणि सामाजिक सद्भावनेचा मार्ग प्रशस्त होईल, असे मत ह.भ.प. शामसुंदर महाराज सोन्नर यांनी अमरावती येथील मशिदीत प्रवचन करताना व्यक्त केले.

अमरावती येथील मस्जिद तौहीद येथे जमाते इस्लाम ए हिंदच्या वतीने सामाजिक सद्भावना संमेलन आयोजित केले होते. त्यात शामसुंदर महाराज सोन्नर यांचे प्रवचन झाले. यावेळी मस्जिदचे इमाम हाफ़िज़ अब्दुल क़ादिर अंसारी यांच्यासह रफ़ीक़ अहमद खान, अज़मत उल्लाह खान, जावेद उल्लाह खान, प्रा.डॉ. कल्याणकर, आशिष कडू, श्रीकांत बाबूळकर, प्रवीण सदार, खलील, रफिक खान, प्रदीप पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी शामसुंदर महाराज म्हणाले, धर्माची निर्मिती मानवी जीवनाला आचारसंहिता असावी म्हणून झाली. माणसाचे जगणे सुसह्य व्हावे, ही त्या मागची भूमिका असावी. मात्र आज धर्माधर्मात संघर्ष निर्माण होत आहेत. ज्यातून समाज एकसंघ राहण्याऐवजी दुभंगला जात आहेत. काही लोक आपल्या राजकीय स्वार्थासाठी धार्मिक तेढ वाढविण्यासाठी प्रयत्न करीत आहेत, अशा वेळी हिंदू आणि मुस्लिम धर्मातील जाणत्या लोकांनी एकत्र येऊन सामाजिक सद्भावना वाढविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. जमाते इस्लाम ए हिंदच्या वतीने आयोजित केले जाणारे सद्भावना संमेलन ही दरी कमी करतील, असा विश्वास शामसुंदर महाराज सोन्नर यांनी व्यक्त केला. यावेळी समारोप करताना मस्जिदचे इमाम हाफिज अब्दुल कादीर अन्सारी म्हणाले, इस्लामबाबत सध्या जाणीवपूर्वक गैरसमज पसरविले जात आहेत. कुराणमध्येही आमन शांतीचाच संदेश दिलेला. हा शांतीचा संदेश लोकांपर्यंत पोहचला तर दोन्ही धर्मात असलेले गैरसमज दूर होतील, त्यासाठी आपण मिळून प्रयत्न करूया, असे आवाहन त्यांनी केले.

## इफको व संजीवनी गृपच्यावतीने १८ एप्रिल रोजी राज्यस्तरीय ऊसपीक परिसंवाद

**कोपरगाव । किसन पवार**

इफको नवीदिल्ली व संजीवनी गृपच्यावतीने उस पीक खत व्यवस्थापनात नॅनो खतांचा वापर, कृत्रिम बुध्दीमत्ता उस उत्पादन व साखर उतारा या विषयावर शिर्डीच्या मॅरीगोल्ड रिजेन्सी येथे १८ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता राज्यस्तरीय एकदिवसीय उस पीक परिसंवादाचे आयोजन केल्याची माहिती इफकोचे संचालक, युवानेते व राज्य सहकारी साखर संघाचे संचालक विवेक कोल्हे यांनी दिली.



ते पुढे म्हणाले की, सर्व उस उत्पादक सभासद व शेतकऱ्यांचे प्रति हेक्टरी पीकाचे उत्पादन वाढावे म्हणून माजीमंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांचा वसा घेत संजीवनी उद्योग समुहाचे अध्यक्ष बिपीन कोल्हे व सर्व संचालक मंडळाच्या मार्गदर्शनांखाली थेट धडक कार्यक्रम शेतक-यांच्या बांधावर संजीवनीच्या कार्यक्षेत्रात घेत असुन त्यातुन राज्यातील शेतक-यांचे प्रबोधन व्हावे या उद्देशाने शिर्डी येथे एकदिवसीय राज्यस्तरीय परिसंवादाचे आयोजन केले आहे. यात इफको थीम बाबत आपण स्वत:, तसेच इफकोचे राज्य विपणन व्यवस्थापक यु. आर. तिजारे, पुणे चे वरिष्ठ विपणन व्यवस्थापक डॉ. एम. एस. पोवार हे उस पीक खत व्यवस्थापनामध्ये इफको नॅनो खतांचा वापर, तर ऊस उत्पादन वाढीत एआय-कृत्रिम बुध्दीमत्तेचा प्रभावी वापर ऊस उत्पादन वाढ, साखर उतारा व त्यापुढील आव्हाने यावर मृदा शास्त्र कृषी विज्ञान केंद्र बारामतीचे विशेषज्ञ डॉ. विवेक भोईटे, वसंतदादा शुगर इन्स्टीट्युट चे पीक उत्पादन व संरक्षणातील प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. ए. डी. कडलग, तर इफको एम. सी. पुणे चे विभागीय विपणन व्यवस्थापक दौलत बोरस्ते हे उस रोग व कीड व्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शन करून शेतक-यांच्या शंकांचे निरसन करणार आहेत., तरी जास्तीत जास्त शेतकरी, साखर कारखान्यांच्या प्रतिनिधींनी उपस्थित राहुन या परिसंवादाचा लाभ घ्यावा असे आवाहन इफको व संजीवनी गृपच्यावतीने करण्यांत आले आहे.

Friends of Rayat Samachar
इंडी जर्नल वाचण्यासाठी
QR code scan करा